पुणे.
दिनांकः ६/०६/२०१८.

प्रेसनोट

दिनांक ८/०१/२०१८ रोजी श्री. तुषार रमेश दामगुडे वय -३७ रा. संतोषनगर, कात्रज, पुणे यांनी एल्गार परिषदेच्या आयोजनाचे वेळी कबीर कला मंचचे सुधीर ढवळे व इतर यांनी चिथावणीखोर भाषणे करुन दलित समाजाची दिशाभूल केली व त्यांच्या मनात जहाल माओवादी विचारांचा प्रचार करुन जातीय तेढ निर्माण होईल अशी वक्तव्ये केली व त्याची परिणीती म्हणून कोरेगांव-भिमा व परिसरात दगडफेक, हिंसाचार व जाळपोळ झाली. त्यानंतर महाराष्ट्रामध्ये जिवित, वित्तहानी होऊन जातीय तेढ निर्माण केली वगैरे आशयाची तक्रार दिल्याने सुधीर ढवळे, सागर गोरखे, हर्षाली पोतदार, रमेश गायचोर, दिपक डेंगळे, ज्योती जगताप व इतर यांचे विरुध्द पो.स्टे. विश्रामबाग येथे गु.र.क्रं. ४/१८ भा.द.वि.कलम १५३ (अ), ५०५ (१) (ब) ११७, ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता.

या गुन्हयाचे तक्रारीत ज्या आरोपींची नावे नमूद करण्यात आली होती त्यांच्यावर यापूर्वी माओवादी चळवळीसोबत संबंध असल्याबद्दल पोलीस कारवाई झाली असल्याने त्यांचा इतिहास या गुन्हयाचे तपासादरम्यान काळजीपूर्वक तपासण्यांत आला. त्याच प्रमाणे एल्गार परिषदेच्या पूर्वीच्या त्यांच्या हालचाली तपासल्या असता असे निष्पन्न झाले की, प्रतिबंधीत माओवादी संघटनेचे काही वरिष्ठ नेते एल्गार परिषदेच्या आयोजकांच्या संपर्कात होते.

या माहितीच्या आधारावर या गुन्हयाचा पुढे तपास करण्याचे अनुषंगाने दिनांक १७/०५/२०१८ रोजी नागपूर येथील सुरेंद्र गडलिंग, दिल्ली येथील रोना विल्सन, मुंबई येथील सुधीर ढवळे, हर्षाली पोतदार व इतर आरोपींचे घराची झडती कारवाई करण्यात आली.

या झडतीदरम्यान गुन्हयाच्या तपासात उपयुक्त पुरावा मिळण्याची शक्यता असलेले दस्ताऐवज, पत्रके, लॅपटॉप, हार्ड डिस्क इत्यादी साहित्य रितसर जप्त करण्यात आले होते.

या जप्त साहित्यामधून सुरेंद्र गडलिंग याचेकडे असलेल्या संगणकाची हार्ड डिस्क व रोना विल्सन याचेकडे असलेल्या लॅपटॉपमधील हार्ड डिस्कच्या फोरेन्सिक क्लोन कॉपीजची काळजीपूर्वक छाननी करण्यात आली. या छाननीमध्ये या दोघांच्याही जवळ त्यांचे सीपीआय (माओइस्ट) या प्रतिबंधीत दहशतवादी संघटनेसोबत घनिष्ठ संबंध दर्शविणारे दस्ताऐवज प्राप्त झाले. तसेच या दोघांनी एल्गार परिषदेचे आयोजक सुधीर ढवळे याचेसोबत संपर्क प्रस्थापीत केल्याचे दर्शविणारे दस्ताऐवज मिळून आले. तसेच नागपूर येथील शोमा सेन व महेश राऊत यांचेही प्रतिबंधीत माओवादी संघटनेसोबत संबंध असल्याचे निदर्शनास आले. यावरुन प्रस्तुत गुन्हयामध्ये बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंधक) अधिनियमाचे कलम १३, १६, १७, १८, १८(ब), २०, ३९ या कलमांचा समावेश करण्यांत आला.

एकंदर दस्ताऐवजांचा साकल्याने अभ्यास केल्यानंतर एल्गार परिषदेच्या आयोजनामध्ये माओवाद्यांचा सहभाग व प्रेरणा सकृतदर्शनी स्पष्ट होत असल्याने विश्रामबाग पो.स्टे.कडील गुन्हयाच्या पुढील तपासकामी आज दिनांक ६/०६/२०१८ रोजी नागपूर येथून १) ॲड. सुरेंद्र गडलिंग, २) शोमा सेन, ३) महेश राऊत, दिल्ली येथून ४) रोना विल्सन व मुंबई येथून ५)सुधीर ढवळे यांना अटक करण्यांत आली आहे.

या गुन्हयाचा पुढील तपास श्री. शिवाजी पवार, सहा. पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे शहर हे करीत आहेत.


पुणे शहर पोलीस